## महाआवास अभियानातील विभागस्तरीय पुरस्कारांचे वितरण ७ डिसेंबर रोजी

**पुणे :** महाआवास अभियान पुरस्कारांचे वितरण बुधवार ७ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता विभागीय आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते विधान भवन मुख्य सभागृह येथे करण्यात येणार आहे.

महाआवास अभियान कालावधीत पुणे विभागात अभियानात उत्कृष्ट कार्य करणारे जिल्हे, तालुके, ग्रामपंचायती, शासकीय जागा उपलब्धतेसाठी सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके, वाळू उपलब्धतेत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके यांना विभागस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातून ही निवड केली आहे.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य शासन पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता व गुणवत्ता वाढीसाठी पुणे विभागात महाआवास अभियान राबविण्यात येत आहे.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**पिंपरी / प्रतिनिधी**

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना महापालिका/ीीपर्सीीपस, /ीीपर्सीीपसविविध राजकीय पक्षांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.पिंपरी चौक येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास महापालिकेच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, जितेंद्र वाघ, उल्हास जगताप, सह आयुक्त आशादेवी दुरगुडे, उप आयुक्त चंद्रकांत इंदलकर, विठ्ठल जोशी, रविकिरण घोडके, सहाय्यक आयुक्त वामन नेमाणे, क्षेत्रीय अधिकारी अण्णा बोदडे, विजयकुमार थोरात, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, जनसंपर्क विभागाचे प्रफुल्ल पुराणिक, कर्मचारी महासंघाचे महादेव बोत्रे, मनोज माछरे, उमेश बांदल, बालाजी ऐयंगार,शेखर गावडे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

पिंपरी येथील हिंदुस्थान अँटीबायोटीक्स कंपनी परिसरातील तसेच दापोडी चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. एच.ए. कॉलनी येथील कार्यक्रमास सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, माजी नगरसदस्या सुजाता पालांडे, सुलक्षणा धर सामाजिक कार्यकर्ते संजय केंगले, रमेश जाधव, मिलिंद जाधव, रवि कांबळे, सुरेंद्र पासलकर, मारोती बोरावले,सुनील थोरात, सुनिता शिवतारे, सुरेश केंगले यांच्यासह पलीं;किंपनी कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते. तर, दापोडी येथील कार्यक्रमास पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, पोलीस उप निरीक्षक पलीं;बालाजी झोनापल्ली, माजी नगरसदस्य राजू बनसोडे, रोहित अप्पा काटे, संजय काटे, माजी नगरसदस्या स्वाती उर्फ माई काटे, चंद्रकांता सोनकांबळे यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी तसेच प्रतिनिधी उपस्थित होते.

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे अभिवादन करण्यात आले. पिंपरी येथील मुख्य चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी माजी राज्यसभा खासदार अमर साबळे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी स्थायी समिती सभापती नितीन लांडगे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, दक्षिण भारत आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सरचिटणीस विजय फुगे, माजी नगरसेविका अनुराधा गोरखे, सुजाता पलांडे, शैला मोळक, मनोज तोरडमल, सुभाष सरोदे, कोमल शिंदे, धनराज बीरदा, दीपक नागरगोजे, सतीश नागरगोजे, मंगेश धाडगे, सचिन उदागे, गिरीष देशमुख, कैलास सानप, प्रमोद ताम्हणकर, संतोष मोरे, गणेश ढाकणे, हेमंत देवकुळे, समीर जावळकर, प्रशांत बाराथे, संजय परळीकर आदी उपस्थित होते.

माजी खासदार साबळे म्हणाले की, हजारो वर्षांपासून शिक्षण नाकारलेल्या कनिष्ठ जातींमध्ये अज्ञान व निरक्षरता होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कनिष्ठ जातींना त्यांच्या या दयनीय स्थितीचे कारण शिक्षणाचा अभाव हेच आहे याची जाणिव करून दिली. (झळाीिळ छ्शुी) कनिष्ठ जातींच्या लोकांनी त्यांच्या मुलांना शाळेत पाठवावे यासाठी बाबासाहेबांनी त्यांना प्रोत्साहन दिले. त्यामुळेच आज दलित समाज सुशिक्षित झाला. भारतीय संविधानाचे शिल्पकार असलेल्या डॉ. बाबासाहेबांमुळेच आपल्याला शिकासंघटित व्हा आणि संघर्ष करा.. हा मूलमंत्र मिळाला.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त उच्छिल येथे शालेय मुलांना वह्यांचे वाटप

**जुन्नर / प्रतिनिधी**

भारतीय घटनेचे शिल्पकार, विश्वरत्न, भारतरत्न, परमपुज्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करून आज जि प प्रा शाळा उच्छिल येथील सर्व शालेय विद्यार्थ्यांना ठाणे येथील अंबरनाथ चे आमदार डॉ. बालाजी किणीकर व समिधा कोरडे माजी नगरसेविका यांच्या सौजन्याने वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला किरण म्हसकर महसुल विभाग जुन्नर यांच्या प्रयत्नातून आदिवासी भागातील मुलांना बक्षीस देण्यात आले. विद्यार्थ्यांना यानिमित्ताने नियमित शाळेत जावे, आपला परिसर स्वच्छ ठेवावा,नेहमी खरे बोलावे. कचरा कुंडीतच टाकावा, झाडे लावा झाडे जगवा वडीलधाऱ्या व्यक्तींचा व गुरुजनांचा मान राखावा, सारे शिकूया पुढे जाऊया, वाचाल तर वाचाल, शिकाल तर टिकाल, शिक्षणाला सहकार्य हेच आमचे ध्येय,ज्ञानवंद व्हा! गुणवंत व्हा! यशवंत व्हा! अशा गोड गोड शुभेच्छा दिल्या. सुंदर व आकर्षक आणि सुरेख वह्या ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त वाटप करण्यात आल्या.

# आळंदीत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**आळंदी / प्रतिनिधी**

संविधानाचे वाटप व वाचन करून भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनी आळंदीत विविध ठिकाणी विविध सेवाभावी व्यक्ती संस्था यांचे वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेचे पूजन , पुष्पहार अर्पण करीत पुष्पांजली वाहत उपस्थितांनी विनम्र अभिवादन केले. यावेळी जय शिवराय, जय भीम नारा देत महापुरुषांचा जयघोष करण्यात आला

६ डिसेंबर रोजी आळंदी परिसरात विविध सेवा भावी संस्थानचे वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महा परिनिर्वाण दिनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक मध्ये भारतीय बौद्ध महासभा आळंदी शहर शाखेच्या वतीने सामूहिक त्रिसरण ,पंचशील, बुद्ध वंदना घेण्यात आली. यावेळी डॉ निलेश रंधवे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित अस्पृश्यता निवारण व सामाजिक विषमता दूर करण्याच्या कार्याची माहिती दिली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मजूर मंत्री असताना कामगार यांचे कामासाठी कामाचे १२ तास वरून ८ तास केले. महिलांसाठी पगारी प्रस्तुती रजा मंजूरकेली. अनेक भारतीय जाती, भाषा, पंथ यांना जोडून ठेवणाऱ्या कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या भारतीय राज्यघटना लिहिण्याचे मोलाचे कार्य केले.याबाबत माहिती दिली. आयु विलास रणपिसे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले धम्मचक्र प्रवर्तन याबद्दल माहिती दिली. रिपब्लिकन सेनेचे खेड तालुका अध्यक्ष आयु संदीप रंधवे यांनी देखील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यावेळी जाती विषमते विरुद्ध उभारलेल्या चळवळी व आंदोलनाची माहिती दिली. यावेळी विश्वनाथ थोरात,




बौद्धचार्य आयु राजेंद्र रंधवे, आयु अक्षय रंधवे,आयु प्रभानंद शेलार, आयु विलास खळसोंडे उपस्थित होते. भारतीय बौद्धमहासभा आळंदी अध्यक्ष आयु ज्ञानेश्वर बनसोडे यांनी अभिवादन करून समारोप केला.

**क्रांती पार्क येथे अभिवादन**

आळंदी येथील आळंदी ग्रामीण रुग्णालय परिसरातील क्रांती पार्क येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दीना निमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे युवा नेते उमेश रानवडे यांचे हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांचे प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आळंदी ग्रामीण रुग्णालयाचे वरिष्ठ लिपिक कविता भालचीम, आळंदी जनहित फाउंडेशनचे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, नेचर फाउंडेशनचे अध्यक्ष भागवत काटकर यांनी पुपांजली अर्पण केली. या प्रसंगी आळंदी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शेखर गायकवाड, भाईचारा फाउंडेशनचे अध्यक्ष सुलतान शेख, सामाजिक कार्यकर्ते शिरीष कारेकर, उद्योजक महंमद हकीम, सुरेश भोसले, राहुल कुऱ्हाडे, प्रशांत लोणकर,सचिन आढावले, मंचक यादव, महेबूब शेख आदी उपस्थित होते. आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, सुलतान शेख यांनी संयोजन केले.

**आळंदी युवासेने तर्फे अभिवादन**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिना निम्मित शिवसेना युवासेना आळंदी शहर शाखेच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे आळंदी पोलीस स्टेशन चे वरीष्ठ पोलिस निरीक्षक रमेश पाटील, शिवसेना शहर प्रमुख अविनाश तापकीर, विभाग प्रमुख तुषार नहार,उपशहर शशिराजे जाधव, मंगेश तिताडे, संपर्क प्रमुख बालाजी शिंदे, युवासेना शहर प्रमुख मनोज पवार, स्वराज ग्रुप अध्यक्ष आशिष गोगावले, अनिकेत डफळ, योगेश पंडित यासह शिवसैनिक उपस्थित होते.

**आळंदी भाजी मंडई शाखे तर्फे अभिवादन**

महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल संलग्न पथारी सुरक्षा दल आळंदी अंकित भाजी मंडई शाखेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.

## आकुर्डीत कारखान्याला भीषण आग; शेजारील शाळेने दाखवले प्रसंगावधान

**पिंपरी / प्रतिनिधी**

आकुर्डीतील पांढारकर नगर येथील रिअल फ्राग्रांन्सेस अगरबत्ती पुणे प्रायवेट लिमिटेड या अगरबत्तीच्या कारखान्याला आज (मंगळवारी) सकाळी साडे दहाच्या सुमारास भीषण आग लागली.या आगीमुळे संपुर्ण परिसरात धूराचे लोट निर्माण झाले होते.

आगीचे रौद्ररुप पाहता घटनास्थळी एकूण सहा अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल झाल्या होत्या.अथक प्रयत्नानंतर ही आग विझवण्यात आली. आगीचे लोट व धूर दिसताच कारखान्याला लागूनच असलेल्या बीना इंग्लिश स्कूलच्या शिक्षकांनी प्रसंगावधान दाखवत शाळेतील सुमारे ४५० मुलांना शाळे बाहेर काढले. आगीचे रौद्ररुप पाहता घटनास्थळी एकूण सहा अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल झाल्या होत्या. त्याचा मार्फत आग विझवण्याचे काम करण्यात आले.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, कारखाना हा नागरी वस्तीत असल्याने कारखान्याच्या एका बाजूला बीना इंग्लिश स्कूल, दुसऱ्या बाजूला रेल्वे लाईन व दळवी नगर असा परिसर आहे. वर्दळीचा भाग असल्याने परिसरात भितीचे वातावरण आहे. तसेच अग्निशमदलाच्या वतीने आग विझवण्याचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. आग कशामुळे लागली याचे अद्याप कारण समजू शकलेले नाही.

पांढरकरवस्ती हा दाट लोकवस्तीचा भाग असून येथे कंपन्या व घरे आहेत. दळवीनगर रेल्वे उड्डाणपुला लगत हा परिसर आहे. पुलाच्या जवळ बैठी घरे आहेत. त्यानंतर बिना इंग्लिश मिडीयम स्कुल व त्याला लागूनच रिअल फ्रेग्रेन्सस (पुणे) प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी आहे. या कंपनीत अगरबत्ती व धूप बनवतात. त्याच्या शेजारी वर्धमान ग्रुप ऑफ इंडिया ही कपंनी असून ती चहापत्ती व बेकरी प्रॉडक्ट्स तयार करते.

या दोन कंपन्यांचे आगीमध्ये नुकसान झाले आहे. अंदाजे १० वा आग रिअल फ्रेग्रेन्सस (पुणे) प्रायव्हेट लिमिटेड या कपंनीत लागली व तेथून धुराचे लोट बाहेर निघू लागले. येथे अगरबती व धूप तयार करण्यासाठीची जवलनशील सामग्री असल्याने आग आणखीनच धुमसली. त्यामुळे आतील कर्मचारी स्वतः चा जीव वाचवण्यासाठी बाहेर पडले.

एल&टी फायनान्स लिमिटेड
**नोंदणीकृत कार्यालय:** 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24-परागणा उत्तर.
**CIN No.:** U65910WB1993FLC060810
**शाखा कार्यालय:** पुणे

L&T Financial Services

### तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई-लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत.

| कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 01/12/2022 नुसार (रुपयांमध्ये) | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. प्रकाश ए दाभोळे<br>2. वैशाली दाभोळे | मालमत्तेचा पत्ता – फ्लॅट नं.12 पहिल्या मजल्यावर, क्षेत्रफळ 61.9 चौरस मीटर्स किंवा 666 चौरस फिट अशा बिल्डिंग बी मध्ये जिचं नाव साई विहार कॉम्प्लेक्स को-ऑपरेटीव हाउसिंग सोसायटी लिमिटेड असून प्लॉट नं.19, सर्वे नं.480 (नवीन), सीटीएस नं.873 वर उभी आहे, तळेगाड दाभाडे स्टेशन, मावळ नगरपालिकेच्या हद्दीत आणि सब रजिस्ट्रार, जिल्हा-पुणे आणि सीमा अशी –<br>पूर्व – प्लॉट नं. 13<br>दक्षिण – प्लॉट नं 18<br>पश्चिम – प्लॉट नं 14<br>उत्तर – रस्ता | PUNHL13000319 आणि PUNHL13000359 | 30.08.2022 | ₹1,72,627.2 | 12,83,208.80 | ₹17,26,272/- | 16/12/2022 | 23/12/2022 |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. ही ई-लिलाव विक्री अधिकृत अधिकाऱ्याद्वारे सार्वजनिक ई-लिलावाच्या पद्धतीच्या मदतीने सरफेसी कायद्याच्या तरतुदींखाली करण्यात येत आहे.
2. हा सार्वजनिक ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावात सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **01.12.2022.** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावात यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावाच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे ई-लिलावाच्या तारखेला म्हणजे **08.12.2022** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **09.12.2022** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करावा म्हणजे मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहिती, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना म्हणजे **''शांताराम शेणॉय, मोबाइल नं. +91 9822989925, पत्ता: एल&टी फायनान्स लि, ऑफिस नं. 301, 3रा मजला, झेनिथ कॉम्प्लेक्स, सकाळ संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे – 411005 आणि अंकीत विग, संपर्क क्रमांक – 8668943242, एल&टी फायनान्स लि. ऑफिस: 6वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400 098''** या पत्त्यावर संपर्क साधावा. ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी बोली/प्रस्ताव स्विकारू/नाकारू/बदल/रद्द करु शकतात किंवा कोणतेही कारण न देता आणि पूर्वसूचना न देता लिलाव पुढे नेऊ शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा एसएआरएफएईएसआय कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 07.12.2022
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

एल&टी फायनान्स लिमिटेड
**नोंदणीकृत कार्यालय:** 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24-परागणा उत्तर.
**CIN No.:** U65910WB1993FLC060810
**शाखा कार्यालय:** पुणे

L&T Financial Services

### तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई-लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत.

| कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 01/12/2022 नुसार (रुपयांमध्ये) | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. प्रल्हाद मंगीलाल तिवारी<br>2. द्रौपदी प्रल्हाद तिवारी | मालमत्तेचा पत्ता – फ्लॅट नं.107, क्षेत्रफळ अनुक्रमे 792 चौरस फिट, 1 ला मजला, बिल्डिंग-डी विंग, ओएलएस नं.147 नवीन एस.नं.175 हिस्सा नं. 3/a/1, सप्तरंग आकाश को.-ऑप हाउसिंग सोसायटी लि., सासवड रोड, फुरसुंगी, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे, ज्याच्या सीमा अशा | PUNHL15001079, PUNHL15001166 आणि PUNHL15001167 | 23.08.2022 | ₹2,89,170/- | ₹76,76,591.62 | ₹28,91,700/- | 16/12/2022 | 23/12/2022 सकाळी 11 वाजता |
| 1. प्रल्हाद मंगीलाल तिवारी<br>2. द्रौपदी प्रल्हाद तिवारी | मालमत्तेचा पत्ता – फ्लॅट नं.107, क्षेत्रफळ अनुक्रमे 792 चौरस फिट, 1 ला मजला, बिल्डिंग-डी विंग, ओएलएस नं.147 नवीन एस.नं.175 हिस्सा नं. 3/a/1, सप्तरंग आकाश को.-ऑप हाउसिंग सोसायटी लि., सासवड रोड, फुरसुंगी, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे, ज्याच्या सीमा अशा<br>सीमा अशा-<br>पूर्व – मोकळी जागा<br>दक्षिण – फ्लॅट नं.101<br>पश्चिम – फ्लॅट नं.107<br>उत्तर – कॉमन रोड | PUNHL15001079, PUNHL15001166 आणि PUNHL15001167 | 23.08.2022 | ₹2,88,489.6 | ₹76,76,591.62 | ₹28,84,896/- | 16/12/2022 | 23/12/2022 सायंकाळी 3 वाजता |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. ही ई-लिलाव विक्री अधिकृत अधिकाऱ्याद्वारे सार्वजनिक ई-लिलावाच्या पद्धतीच्या मदतीने सरफेसी कायद्याच्या तरतुदींखाली करण्यात येत आहे.
2. हा सार्वजनिक ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावात सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **16.12.2022.** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावात यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावाच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे ई-लिलावाच्या तारखेला म्हणजे **23.12.2022** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **24.12.2022** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करावा म्हणजे मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहिती, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना म्हणजे **''शांताराम शेणॉय, मोबाइल नं. +91 9822989925, पत्ता: एल&टी फायनान्स लि, ऑफिस नं. 301, 3रा मजला, झेनिथ कॉम्प्लेक्स, साखर संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे – 411005 आणि अंकीत विग, संपर्क क्रमांक – 8668943242, एल&टी फायनान्स लि. ऑफिस: 6वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400 098''** या पत्त्यावर संपर्क साधावा. ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी बोली/प्रस्ताव स्विकारू/नाकारू/बदल/रद्द करु शकतात किंवा कोणतेही कारण न देता आणि पूर्वसूचना न देता लिलाव पुढे नेऊ शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा एसएआरएफएईएसआय कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 07.12.2022
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक - अशोक विठ्ठल सोनवणे** RNI : MAHMAR/२०११/४०९८३. Email - lokmanthan.pune@gmail.com